Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 135 – 139
DOI: 10.5281/zenodo.10072869

Original Research Article

# महात्मा गांधी यांचे सत्याग्रह विषयक विचार

प्रा. डॉ. उप्पलवार सीमा बाबुराव

सहाय्यक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग, महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर जि. लातूर ४१३५१५ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: suppalwar@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 27 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

अहिंसा आणि शांतीचा संदेश देणारे महात्मा गांधी हे आधुनिक भारतातील एक युग प्रवर्तक युगप्रवर्तक नेते होते. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात क्षेत्रात भारताला महत्त्व मिळवून देणाऱ्या देणाऱ्या ज्या व्यक्ती भारतात जन्माला आल्या त्या व्यक्तींमध्ये गांधीजींचे स्थान महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्य मिळवून देण्यात त्यांचे योगदान अतुलनीय आहे हिंसेच्या मार्गाने आपण इंग्रजांचा सामना करू नव्हतो कारण आपल्याजवळ अत्याधुनिक शस्त्रसाठा नव्हता परंतु गांधीजींच्या रूपात अहिंसेचा प्रवर्तक जन्माला आला आणि भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतीय इतिहासात इ.स. 1920 ते 1947 पर्यंतचा कालखंड हा गांधीयूग म्हणून ओळखला जातो. या काळात त्यांनी मांडलेले विचार विचार गांधीवाद म्हणून जगप्रसिद्ध आहे आणि तो आज 21 व्या शतकात जीवनाचा गुणधर्म बनला हा राजकीय सिद्धांत नसून. जीवन जगण्यासाठी दिलेला संदेश आहे.भारतीय इतिहासात गांधींचे नाव सुवर्ण अक्षरांनी कोरलेले आहे कारण त्यांनी स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करून देशाला स्वातंत्र्य मिळून देण्याचे महत्त्वाचे कार्य केले सत्य अहिंसा व सत्याग्रह या मूल्यांची व विचारांची देणगी संपूर्ण मानव दिली म्हणून त्यांच्या या सर्व विचारांची 21 व्या शतकात देखील उपयुक्तता दिसून येते त्यांच्या विचारांचा अभ्यास व्हावा या दृष्टिकोनातून प्रस्तुत शोध निबंध लिहिण्याचा प्रयत्न केला

## संशोधनाची उद्दिष्टे

१. गांधीजींची सत्याग्रह संकल्पना अभ्यासणे

२. सत्याग्रहाचे वेगळे मार्ग किंवा पद्धती समजून घेणे

**सत्याग्रहा ची संकल्पना**

सत्याग्रहाचा शाब्दिक अर्थ सत्यावर आरूढ (Holding on truth) सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह .सत्य प्राप्तीसाठी केलेली तपश्चर्या होय. महात्मा गांधींनी जगाला दिलेली महत्त्वपूर्ण देणगी होय. ही संकल्पना मानवी सदवृत्तीवर आधारित आहे. इतर सर्व मार्ग बंद झाल्यावर हा मार्ग वापरावा हे सत्याग्रहाचे सूत्र आहे सत्याचा सातत्याने शोध घेणे आणि सत्य प्राप्त करून घेण्याचा मनात आढळ निश्चय ही सत्याग्रहाच्या तत्वा मागची मूळ प्रेरणा आहे. मानवी संस्कृतीच्या विकासातील महात्मा गांधींचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांचे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान होय. गांधीजी चे सत्याग्रह ही केवळ तत्त्वज्ञान नसून तो एक जीवन मार्ग बनलेला आहे. अन्याय झुलुम आणि हिंसा याविरुद्ध न्याय मार्गाने दिलेला लढा म्हणजे सत्याग्रह होय. यात केवळ सत्य प्रेम व अहिंसा यांचा समावेश असतो हिंसेला व असत्याला स्थान नसते

**जीवन जगण्यासाठीचा मार्ग म्हणून सत्याग्रह**

सत्याग्रहाला जीवन जगण्याचा मार्ग मानतात त्यांच्या मते सत्याग्रहाचा प्रयोग हा केवळ राजकीय नसून व्यक्तिगत आई-वडील, अपत्य, मित्र व अपराधी यांच्याविरुद्ध ही केला जातो

**सत्याग्रही बनण्यासाठी आवश्यक गुण**

१. अहिंसेवर दृढ विश्वास (faith in non- violence)
२. ईश्वरावर पूर्ण श्रद्धा. (Unbounded faith in God)
३. आत्म नियंत्रण (self-control)
४. चोरी न करणे (अस्तेय) (vow of Non -stealing)
५. अपरिगृह (non-possession)
६. स्वदेशी चा प्रयोग (Use of Swadeshi)
७. नशीली वस्तूंचे सेवन न करणे सेवन (prohibition of drugs & liquor)
८. शारीरिक व मानसिक अवलंबन (physical and mental discipline)
९. अध्यात्मिक एकतेवर विश्वास (faith in spiritual unity)

गांधीजींच्या मते सत्याग्रही बनण्यासाठी वरील सर्व गुण व्यक्तीमध्ये आवड असणे आवश्यक असतेसत्याग्रही व्यक्तीची अहिंसेवर दृढ श्रद्धा असली पाहिजे अहिंसाहाज परमोधर्म त्याने मानला पाहिजे त्याची ईश्वरावर देखील पूर्णपणे विश्वास असला पाहिजे आणि त्याचे स्वतःवर नियंत्रण असणे आवश्यक आहे तरच तो सत्याग्रही भरण्यास योग्य असू शकतो असू शकतो सत्याग्रही व्यक्ती ने कधीही चोरी करू नये गांधीजींनी तर याचा फारच व्यापक अर्थ घेतला दुसऱ्यांची वस्तू त्यांना न विचारता घेणे आणि मनात लालसा ठेवून दुसऱ्यांच्या वस्तूकडे न पाहणे याचे देखील सत्याग्रही व्यक्तीने पालन केले पाहिजे स्वदेशी वस्तूंचाच संग्रह केला पाहिजे व्यसना पासून मुक्त असले पाहिजे.

सत्याग्रही व्यक्ती शारीरिक आणिमानसिक मानसिक या दोन्ही दृष्टीने अहिंसेचा अवलंब केला पाहिजे तसेच अध्यात्मिक एकतेवर विश्वास ठेवला पाहिजे ठेवला पाहिजे या प्रकारे गांधीजींनी सत्याग्रही व्यक्तींना पाळावयाचे नियम सांगितले

**सत्याग्रहाची प्रासंगिकता आणि व्यावहारिकता**

सत्याग्रहाला गांधीजींनी व्यक्तिगत आणि सामूहिक दोन्ही प्रकारांमध्ये प्रभावशाली उपाय आहे असे सांगितले आहे गांधीजी जेव्हा सर्वप्रथम आफ्रिकेमध्ये राहायला गेले तेव्हा तेथील भारतीयांची स्थिती फारच वाईट होती तेथे काळा गोरा भेद होता आणि तेथील भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध गांधीजींनी याचा प्रयोग केला त्यानंतर भारतात देखील त्यांनी ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध शस्त्राचा वापर न करता सत्याग्रह पद्धतीचा अवलंब ब्रिटिश सरकार विरुद्धकेला आणि या कार्यात त्यांना यश देखील मिळाले मिळाले सध्याच्या वातावरणासाठी देखील सत्याग्रह याचा .उपयोग होऊ शकतो परंतु हा प्रयोग करण्यासाठी आत्मिक बलाची अत्यंत आवश्यकता असते.

**सत्याग्रहाच्या विभिन्न पद्धती**

गांधी गांधीजींनी सत्याग्रहाचे संकल्पना सांगितली त्याचे स्वरूप सांगितले आणि त्याच्या विभिन्न पद्धती देखील विस्तार पूर्वक सांगितल्या आहेत सत्याग्रही ने सर्वप्रथम कोणत्याही पूर्वग्रह शिवाय विचार केला पाहिजे आणि ज्याविषयी आपणास सत्याग्रह करावाच आहे त्याच्याविषयी संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे समस्येवर निकाल लावायचा असेल तर त्या दोन व्यक्ती व्यतिरिक्त तिसऱ्या व्यक्तीस मध्यस्थ म्हणून पाठवले पाहिजेआणि तरी जर त्याचा काही उपयोग झाला नाही तर खालील वेगवेगळया पद्धतींचा प्रयोग सत्याग्रहासाठी केला जातो.

**१. असहकार**

गांधीजींच्या मते शासनाचे यश हे प्रत्येक जनतेच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्यावर अवलंबून असते अन्याय विरुद्ध लढा देण्यासाठी असहकार मार्गाचा अवलंब केला पाहिजे शासनाच्या विरोधी आंदोलन करणे शासनाने दिलेल्या पदव्या बक्षिसे पद यांचा त्याग करणे त्यांनी सांगितलेल्या नियमाचे पालन न करणे थोडक्यात असे सांगता येईल की शासनाच्या कोणत्याही शासकीय नियमांचे पालन न करणे वर्ष 1919-20 मध्ये भारतीयांनी ब्रिटिश शासनाविरुद्ध असोयक मार्गाचा अवलंब केला होता

**२. हरताळ**

सत्याग्रहाचे दुसरे रूप हरताळ आहे .गांधीजी याविषयी म्हणतात की हरताल म्हणजे आत्मशुद्धीसाठी केलेला एक ऐच्छिक प्रयत्न होय ह्याचे लक्ष स्वतःला कष्ट देऊनधी लोकांचे हृदय परिवर्तन करणे करणे हा याच्या मागचा हेतू असतो परंतु हरताल करणाऱ्या व्यक्तींची मागणी ही नितांत स्पष्ट आणि बरोबर असली पाहिजेगांधीजींच्या मते हरताल याचा प्रयोग वारंवार होता कामा नये अन्यथा जनतेवर आणि शासनावर याचा कोणताही प्रभाव पडत नाही.

**३. सविनय कायदेभंग**

सविनय कायदेभंग सत्याग्रहाचा अधिक प्रभावशाली रूप आहे याची सुरुवात दांडीयात्रा या असहयोगी आंदोलनाने या आंदोलनाद्वारे अहिंसक आणि विनयपूर्ण मार्गाने कायद्याची अवज्ञा करणे परंतु या मार्गाचा अवलंब करत असताना त्याचे स्वरूप हिंसक बनता कामा नये

**४. देशत्याग (हिजरत)**

सत्याग्रहाचा आणखीन एक प्रकार म्हणजेच देशत्याग किंवा हिजरात याचा अर्थ आपल्या निवासस्थानाचे स्वेच्छेने परित्याग करणे एखाद्या व्यक्तीवर किंवा व्यक्ती समूहात सातत्याने अन्याय अत्याचार होत असेल आणि त्याच्या प्रतिकार आहेस तत्मक मार्गाने करणे शक्य नसेल तेव्हा देश त्याग करावा असे गांधीजी म्हणतात

**५. उपोषण**

उपोषणाद्वारे अन्यायाचा अतिशय प्रभावी पद्धतीने प्रतिकार करता येतो सध्या 21 व्या शतकात देखील या पद्धतीचा अवलंब केला जातो याद्वारे विरोधकाच्या मनाचे हृदय परिवर्तन होते परंतु या पद्धतीचा वापर करत असताना सत्याग्रही व्यक्तीने केली पाहिजे व त्याची मी म्हण शुद्ध असले पाहिजे.

**६. धरणे**

धरणे आंदोलन म्हणजे जी व्यक्ती अन्याय करत असेलतू अन्याय इतरांना लक्षात आणून देण्यासाठी त्याच्या दुकानासमोर किंवा घरासमोर धरणे आंदोलन केले जाते.

**७. बहिष्कार**

गांधीजीच्या मध्ये सत्याग्रहाचे आणखी एक प्रकार म्हणजे सामाजिक बहिष्कार हा बहिष्कार शा शांतीपूर्ण व हिंसात्मक या दोन्ही मार्गाने करता येऊ शकतो हा त्याच्या प्रयोग करण्यावर निर्धारित असतो परंतु गांधीजी नी शांततापूर्ण मार्गाचा अवलंब केला अवलंब केला बहिष्कारद्वारे एखाद्या संस्थेवर शाळेवर दुकानावर किंवा वस्तूंवर बहिष्कार घातला जातोयाचा परिणाम म्हणजे दुष्ट प्रवृत्ती नष्ट होऊन व्यक्ती गैर वर्तनापासून प्रवृत्त होतात.

**८. संप**

अन्याय अत्याचार व जुलुमन याच्या विरोधात संपावर जाणे आधुनिक काळात देखील या मार्गाचा अवलंब केला जातो.

**समारोप**

सत्याग्रही गांधीजींनी आपल्याला दिलेली राजकीय देणगी आहे याचा उपयोग काल आज आणि उदया म्हणजेच स्वातंत्र्यापूर्वी देखील याचा उपयोग चांगल्या पद्धतीने झाला आणि भारतात स्वातंत्र्य मिळाले आज सुद्धा सत्याग्रहातील

काही पद्धतीचा अवलंब केला जातो व सरकार विरोधात आंदोलन केले जाते आणि नैतिक दृष्टीने आपल्या मागण्यांची पूर्तता केली जाते याचाच भविष्य काळात देखील निश्चितच उपयोग होईल कारण हिंसेच्या मार्गाने आपण महायुद्धातून होणारी वित्तहानी,मानव हानी ही पाहिलेली आहे त्यामुळे अहिंसेच्या मार्गाचा अवलंब करून शस्त्राचा अस्त्राचा वापर न करता केल्या जाणाऱ्या सत्याग्रहाचा निश्चितच समाजासाठी हितकारक ठरेल.

**संदर्भ सूची**

१. डॉ. अनिल कठारे - आधुनिक भारताचा इतिहास
२. श्रीकांत देशपांडे - भारतीय राजकीय विचारवंत
३. डॉ. नागोराव कुंभार - सत्याग्रह महात्मा गांधीजींचा दृष्टिकोन
४. डॉ. एस एस गाठाळ - आधुनिक भारतातील सामाजिक धार्मिक सुधारणा चळवळी

This journal is © AAASSHER 2023